# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## परिपत्रक

सर्व शिक्षक, अधिकारी व शिक्षकेतर सेवकांना कळविण्यात येते की, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अमृत महोत्सवी ७५ वा वर्धापन दिन शनिवार दिनांक १० फेब्रुवारी, २०२४ रोजी संपन्न होत आहे. त्या प्रित्यर्थ सर्व शिक्षक, अधिकारी व शिक्षकेतर सेवकांचे विविध गुणदर्शनाचे व सांस्कृतिक कार्यक्रम सोमवार दिनांक १२ फेब्रुवारी, २०२४ रोजी आयोजीत करण्यात येणार आहे.

या परिपत्रकाव्दारे असेही कळविण्यात येते की, जे शिक्षक, अधिकारी व शिक्षकेतर सेवक विविध गुणदर्शन व सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये भाग घेऊ इच्छित आहेत. अशा शिक्षक, शिक्षकेतर अधिकारी व सेवकांनी आपल्या विभागप्रमुखांमार्फत लेखी अर्ज गुरुवार दिनांक ८ फेब्रुवारी, २०२४ पर्यंत श्री. संतोष मदने, प्रशासन शिक्षकेतर कक्ष व श्रीमती मेघना माटे, शैक्षणिक विभाग यांच्याकडे जमा करणे आवश्यक आहे. विविध गुणदर्शन व सांस्कृतिक कार्यक्रमाकरिता वेळेची मर्यादा असल्याने प्रथम येणा—यास प्राधान्य देण्यात येणार आहे. तसेच ऐनवेळी येणा—या सादरीकरणास सहभागी होता येणार नाही.

गुरुवार दिनांक ८ फेब्रुवारी,२०२४ रोजी दुपारी ३.०० ते ५.०० या वेळेत सदर कार्यक्रमात भाग घेऊ इच्छिणा—या शिक्षक, आधिकारी व शिक्षकेतर सेवकांच्या सादरीकरणाची निवड चाचणी होणार आहे. तसेच दिनांक ९ व १० फेब्रुवारी, २०२४ रोजी दुपारी ३.०० ते ५.०० यावेळेत अनुक्रमे तालीम व रंगीत तालीम होणार आहे. याची नोंद घेण्यात यावी.

या सांस्कृतिक, कार्यक्रमामध्ये सहभागी होणा—या शिक्षक, अधिकारी व शिक्षकेतर सेवकांना सदर कार्यक्रमात सहभाग घेतल्याबाबतचे अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त प्रशस्तीपत्रक व स्मृतीचिन्ह देण्यात येणार आहे, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

8/2/2024

(प्रा. (डॉ.) विजय खरे)
प्रभारी कुलसचिव

गणेशखिंड
जावक क्र. आर./2/90
दिनांक : 08/02/2024

सोबत : निर्देश
प्रत माहिती व योग्य कार्यवाहीसाठी

१. सर्व संबंधित शैक्षणिक विभागप्रमुख } सदर परिपत्रक आपल्या अधिपत्याखालील सर्व
२. सर्व संबंधित प्रशासकीय शाखाप्रमुख } सेवकांच्या निदर्शनास आणून द्यावे. ही विनंती.